|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

---

**व्याख्याता मान्यता विभाग**

---

जा. क्र. कबचौ उमवि/१८/७६१/२०२४ | दि. २२/०७/२०२४

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व अव्यवसायिक पदव्युत्तर महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना . . .

विषय : विद्यापीठाशी संलग्नीत विना अनुदानित अव्यवसायिक पदव्युत्तर महाविद्यालयांमध्ये शिक्षक नियुक्त करणे बाबत. . .

संदर्भ : १) मा. विद्या परिषदेचा ठराव क्र. वि.प.ए.- १०१/२०२४ दि. ११.०६.२०२४
२) मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. व्य.प.ए.-८२/२०२४ दि. १९.०६.२०२४

महोदय/महोदया,

विद्यापीठाशी संलग्नीत विना अनुदानित अव्यवसायिक पदव्युत्तर महाविद्यालयांमध्ये शिक्षक या पदावर पूर्वी मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून काम केलेली सेवानिवृत्त व्यक्तीस नियुक्त करणे बाबत, मा. विद्या परिषद ठराव क्र. ए-१११/२०२३ दि. १८/०७/२०२३ व मा. व्यवस्थापन परिषद ठराव क्र. २७१/२०२३ दि. २५/१०/२०२१३ नुसार समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने सर्वंकष विचार करुन नियमावली तयार करण्यात आली, सदर शिफारशींस मा. विद्या परिषदेचा ठराव क्र. वि.प.ए.- १०१/२०२४ दि. ११.०६.२०२४ व मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. व्य.प.ए.-८२/२०२४ दि. १९.०६.२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार खालील प्रमाणे शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही करावी. ही विनंती.

समितीच्या शिफारशीं खालील प्रमाणे :

**अव्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रम शिक्षक नियुक्ती अनिवार्य बाबी**

विद्यापीठ परिक्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सक्षमपणे राबविले जावेत. नियमित तासिका व्हाव्यात व सर्व शैक्षणिक कामकाज प्रभावीपणे व्हावे या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी खालील प्रमाणे कार्यवाही बंधनकारक करण्यात येत आहे.

१. पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव यांचेकडून कार्यभार मंजूर करुन घेण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालये/परिसंस्था यांची राहील.

२. मा. सहसंचालक उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव यांनी निश्चित केलेल्या पदानुसार एका पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी माहे जुलै अखेर खालील प्रमाणे शिक्षकांची व्यवस्था महाविद्यालये/परिसंस्था यांनी रितसरपणे करावी.

| | | |
|---|---|---|
| **अ.** | विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक परिनियम ४१५(१) | मान्यता प्राप्त एकूण पदांपैकी किमान एक शिक्षक |
| **ब** | विद्यापीठ मान्यता प्राप्त सेवानिवृत्त शिक्षक किंवा अहर्ता धारक संबंधित विषयाचा उमेदवार (कंत्राटी पध्दतीने) | मान्यता प्राप्त एकूण पदांच्या ५० % |
| **क** | ४१५(३) अहर्ता धारक (तासिका तत्व) | मान्यता प्राप्त एकूण पदांच्या उर्वरीत पदे |

३. वरील प्रमाणे पदव्युत्तर विभागात कार्यरत शिक्षकांचे नियमाप्रमाणे वेतन/मानधन, मुलाखती, नियुक्ती पत्रे, उपस्थिती नोंद वही इ. देण्याची जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्था यांची राहील.

४. पदव्युत्तर अभ्यासक्रमात कार्यरत शिक्षकांना विद्यापीठ/महाविद्यालय यांचे आदेशाप्रमाणे शैक्षणिक कामकाज तसेच परीक्षा विषयक कार्य करणे बंधनकारक राहील.

५. मुद्या क्र. २ (ब) नुसार सेवानिवृत्त शिक्षकांना वय ६५ पर्यत कार्यभार देता येईल.

६. पदव्युत्तर अभ्यासक्रमास कार्यरत शिक्षकां संदर्भात महाविद्यालय विकास समितीत शैक्षणिक वर्ष प्रारंभी ठराव करणे आवश्यक राहील.

७. मुद्या क्र. २ ब व क साठी महाविद्यालयांना स्व-अधिकारात महाविद्यालयांच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करावी व माहे जुलै अखेर मुलाखती आयोजित कराव्या त्यासाठी चार सदस्यीय समितीचे गठन करावे.( संस्थाध्यक्ष, प्राचार्य, विभाग प्रमुख, विषय तज्ञ ( महाविद्यालय बाहय) व पुढील कार्यवाही करावी. (निवड समितीचे संपूर्ण अहवाल महाविद्यालयाने जतन करावेत.)

८. मुलाखत अहवाल व इतर दस्तऐवज विद्यापीठ पत्र जा.क्र.कबचौ उमवि/१८/५९३/२०१९ दि. ०३/०६/२०१९ नुसार असणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सोबत जोडल्या प्रमाणे अहवाल महाविद्यालय /परिसंस्था यांनी दि. ३१ ऑगस्ट पर्यत विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागास सादर करावा.

**अहवाला सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक असतील.**

**१. सी.डी.सी. ठराव**

**२. नियुक्ती पत्रे**

**३. रुजू अहवाल**

**४. शैक्षणिक दस्तऐवज (प्रत्येकी पदवी/पदव्युत्तर/नेट/सेट/पीएचडी)**

**५. विद्यापीठ मान्यता पत्र.**

**६. जाहिरात कात्रण**

**७. मा. सहसंचालक कार्यालयाचे कार्यभार मान्यता प्रत.**

तरी उपरोक्त कार्यपध्दती प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
(व्याख्याता मान्यता विभाग)

सोबत : अहवालाचा नमुना

*संस्था/महाविद्यालयाच्या लेटरहेड वर*

---

<u>अहवाल नमुना</u>

महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव : ____________________

महाविद्यालय विकास सकिती ठराव दिनांक : ____________________

शैक्षणिक वर्ष : ____________________

अभ्यासक्रमाचे नाव : ____________________

मान्य एकूण पदांची संख्या : ____________________

| अ. क्र. | शिक्षक | शिक्षकाचे पूर्ण नाव | विद्यापीठ मान्यता पत्र | नियुक्ती पत्र दिनांक | रुजू अहवाल दिनांक | कार्यभार (तासिका) | सेवा निवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यापीठ मान्यता शिक्षक | १ | | | | | |
| २ | सेवानिवृत्त शिक्षक किंवा अहर्ताधारक संबंधित विषयाचा उमेदवार (कंत्राटी पध्दतीने) | १ | | | | | |
| | | २ | | | | | |
| | | ३ | | | | | |
| ३ | ४१५(३) नुसार तासिका तत्व | १ | | | | | |
| | | २ | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वर नमुद केलेली माहिती अचूक व सत्य असून त्यात काही चूकीचे आढळल्यास त्यास निम्न स्वाक्षरी कर्ता सर्वस्वी जबाबदार राहील.

अध्यक्ष/ सचिव/ प्राचार्य

सही व शिक्का